

# माहे डिसेंबर २०२१ महाचा मासिक अहवाल
## मासिक अहवालामध्ये खालील घटकांनी चांगली कामगिरी केलेली आहे.

| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| १ | परभणी | पंच | १) पोहवा/ ३६७ बुधवारे<br>२) पोहवा/८७८ ठाकुर | पालम पो. स्टे. जि. परभणी गु. र. नं. १३९ / २०२१ भा. द. वि. कलम ३९४ हा गुन्हा दि. ३०/१२/२०२१ रोजी ०६ : ३८ वाजता दाखल असून घटनास्थळावरील आरोपीने हाताळलेली रक्त लागलेल्या लाकडी काठीचा वास श्वान पंच यास दिला असता श्वान पंच हा घटनास्थळावर फिरून घराचे बाहेर येवुन उजव्या बाजूने मार्ग काढीत कापसाचे शेताशेताने फिरून मरडगाव ते चाटोरी रोडवर घरापासुन उत्तरेस अंदाजे ८०० मीटर अंतरावर जावुन घटमळून भुंकून योग्य मार्गदर्शन केले.<br>तसेच पोनि श्री काकडे पालम पो.स्टे. यांनी संशयीत आरोपी व इतर काही लोक घटनास्थळाचे बाजुस आणुन उभे करून ओळख परेड घेणेसाठी आदेशीत केले असता श्वान पंच यास रक्त लागलेल्या लाकडी काठीचा वास दिला असता श्वान पंच हा तेथील उभे असलेल्या लोकांमध्ये जावुन त्यातील एका व्यक्तीच्या अंगावर पाय ठेवले असता त्यास ताब्यात घेवुन तपास केला असता त्याने गुन्हा केल्याचे कबुल केले. |



| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| २ | रत्नागिरी | विराट | १) पोना/८०० एम.ई. हरचिरकर<br>२) पोना/४४१ एस.एस.कोतवडेकर | दापोली पो.स्टे. जि.रत्नागिरी गु.र.नं. ९०/२०२१ भा.द.वि. कलम ३६३ हा गुन्हा दि.१९/१२/२०२१ रोजी १७:१५ वाजता दाखल असून घटनास्थळावरील अपरहण झालेल्या मुलाच्या वापरत्या शुजचा वास श्वान विराट यास दिला असता श्वान घटनास्थळावरून निघून भातशेती व जंगलमय भागाकडे सुमारे २५ मी पर्यंत वास घेत जावुन पुढे पायवाटेने ४५० मीटर वास घेत घेत जावुन पुढे शेतमळयाच्या बंधा-यापाशी जावुन घुटमळू लागला रात्रीची वेळ असल्याने पुढे जाण्यास अडचण असल्याने काम थांबवीले. दुस-या दिवशी गावातील लोकांनी पुढे शोध घेतला असता त्याच दिशेला ५० मीटर अंतरावर सदर लहान मुलगा मिळुन आला आहे. |



| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ३ | कोल्हापुर | स्टेला | १) पोहवा/१२५८ पी.एस. निंबाळकर<br>२) पोना/७१२ पी.एन.सुर्वे | हुपरी पो. स्टे. जि. कोल्हापुर गु.र.नं. ११८/२०२१ भा. द. वि. कलम ३६३, ३०२, २०१ हा गुन्हा दि.२३/८/२०२१ ०५:०० वाजता दाखल असून यातील घटनास्थळावरील अपहरण झालेल्या मुलीच्या कापडी मास्कचा वास श्वान स्टेला हीस दिला असता श्वान स्टेला ही मुख्य दरवाजातुन बाहेर निघुन बोळवजा रस्त्यातुन सरळ फिर्यादी यांचे घरापासून १०० मीटर अंतरवार जावुन यळगुड ते कागल जाणा-या डांबरी रोडचे ओम इंजिनीअरींग अँन्ड वेल्डींग वर्क्स नावाचे दुकानासमोर येवुन थांबली. श्वान स्टेला हीने केलेल्या मार्गदर्शनावरून तपास केला असता सदर गुन्हा उघडकीस आला आहे. |



| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ४ | कोल्हापुर | बेली | १) पोहवा/२१७५ पी.एम.माने<br>२) पोशि/१७७ झेंडे | शाहुवाडी पो. स्टे. जि. कोल्हापुर गु.र.नं. २६३/२०२१ भा. द. वि. कलम ३६३, ३०२, २०१ हा गुन्हा दि.३/१०/२०२१ २२:५७ वाजता दाखल असून यातील घटनास्थळावरील अपहरण झालेल्या मुलाच्या पायातील रबरी बुटाचा वास श्वान बेली हीस दिला असता श्वान बेली ही बोळवजा रस्त्याने सरळ फिर्यादींचे घरात जावुन पुन्हा घराचे मागील बाजुचे मोकळया जागेत फिरून बोळवजा रस्त्याने येवुन पुन्हा फिर्यादींच्या घरात येवुन थांबली श्वान बेली हीने केलेल्या मार्गदर्शनावरून यातील फिर्यादीकडे तपास केला असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. |
|  | | | | |
| **अशा प्रकारे माहे डिसेंबर २०२१ मध्ये खून - २, अपहरण - १, जबरी चोरी - १, असे एकुण ४ गुन्हे श्वान पथक / बीडीडीएस पथकामार्फत उघडकीस आलेले आहेत.** | | | | |